पोलीस अधीक्षक कार्यालय,नाशिक ग्रामीण
पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक - पिन 422003
दुरध्वनी नंबर 0253-2309700
E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेस नोट** दिनांक :२०/०६/२०२४

## नाशिक ग्रामीण पोलीस भरती - २०२३

---

नाशिक ग्रामीण पोलीस दलाअंतर्गत ३२ पदांसाठी पोलीस शिपाई भरती २०२२-२३ दिनांक १९/०६/२०२४ ते २२/०६/२०२४ या कालावधीत पोलीस मुख्यालय मैदान, आडगाव येथे आयोजित करण्यात आली आहे. नाशिक ग्रामीण पोलीस आस्थापनेवर पोलीस शिपाई पदांकरीता भरती होणार असून त्यासाठी ३२२५ उमेदवारांचे अर्ज आले आहेत.

दिनांक १९/०६/२०२४ रोजी प्रत्यक्षात पोलीस भरती प्रक्रिया सकाळी ०५.०० वाजता सुरु करण्यात आली. दिनांक १९/०६/२०२४ रोजी एकूण ७०० उमेदवार यांना भरती प्रक्रियेसाठी हजेरीपट पडताळणी, शारीरिक मोजमाप व मैदानी चाचणीसाठी बोलविण्यात आले होते. त्यापैकी एकूण ३९५ उमेदवार भरती प्रक्रियेसाठी उपस्थित राहिलेत आणि ३०५ उमेदवार गैरहजर राहिले आहेत. उपस्थित ३९५ उमेदवार यांच्यापैकी ३१२ उमेदवार मैदानी चाचणीसाठी पात्र झालेत आणि ७८ उमेदवार उंची / छाती व कागदपत्र पडताळणी मध्ये अपात्र झालेत. पात्र उमेदवारांपैकी ३१२ उमेदवार यांची मैदानी चाचणी दिनांक १९/०६/२०२४ रोजी पूर्ण करण्यात आली, त्यामध्ये कोणालाही दुखापत / इजा झाली नाही. मैदानी चाचणी बाकी राहिलेले ०५ उमेदवार यांना २०/०६/२०२४ रोजी बोलविण्यात आले होते.

तसेच दिनांक २०/०६/२०२४ रोजी हजेरी पटावरील एकुण ९०६ उमेदवारांना भरती प्रक्रियेसाठी बोलविण्यात आलेले होते. त्यापैकी ५३३ उमेदवार उपस्थित राहिले, तर ३७३ उमेदवार गैरहजर राहिले. तसेच १९/०६/२०२४ रोजी मैदानी चाचणी बाकी असलेले ०४ उमेदवार असे एकुण ५३७ उमेदवार दि. २०/०६/२०२४ रोजी प्रत्यक्षात हजर होते. उपस्थित उमेदवारांपैकी ४७५ उमेदवार मैदाणी चाचणीसाठी पात्र झालेत आणि ६१ उमेदवार उंची/छाती व कागदपत्र पडताळणीत अपात्र झाले, तर ०१ उमेदवाराने स्वेच्छेने माघार घेतली.

उमेदवारांना मैदानी चाचणीत मिळालेल्या गुणांबाबत त्याचवेळी सांगण्यात आले. भरती प्रक्रियेसाठी उपस्थित १२० उमेदवारांना ग्रामीण पोलीस मुख्यालयातील वस्तीगृहामध्ये राहण्याची व्यवस्था करण्यात आली होती. दरम्यान उमेदवारांना नाशिक ग्रामीण पोलीस दलातर्फे वैद्यकिय सुविधा, नाश्ता, पाणी इ. व्यवस्था करण्यात आलेल्या आहे. त्यांना सर्व प्रकारच्या संधी देण्यात आल्या आहेत.